**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या गुजरात आणि महाराष्ट्राच्या दौऱ्यावर

- संरक्षण दलांसाठी १ लाख १० हजार कोटी रुपयांचे खरेदी प्रस्ताव मंजूर

- भारतीय अंतराळ संशोधन संस्थेचं खासगीकरण होणार असल्याच्या बातम्यांचं इस्रोकडून खंडन

**आणि**

- दिल्लीतल्या इमारत दुर्घटनेतल्या मृतांची संख्या ७ वर, दुर्घटनेची उच्चस्तरीय चौकशी करण्याचे दिल्ली उच्च न्यायालयाचे निर्देश

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या गुजरात आणि महाराष्ट्राचा दौरा करणार आहेत. वडोदरा इथे ३५ हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक खर्चाच्या विविध विकासकामांची पायाभरणी, उद्घाटन आणि लोकार्पण प्रधानमंत्र्यांच्या हस्ते होणार आहे. तसंच, २० हजार ७०० कोटी रुपयांपेक्षा अधिक खर्चातून विकसित केलेल्या वेस्टर्न डेडिकेटेड फ्रेट कॉरिडोरच्या तीन महत्त्वाच्या टप्प्यांचं ते राष्ट्रार्पण करतील. त्याशिवाय चार मालवाहू रेल्वे सेवांना तसंच, वडोदरा आणि तांडा रोड दरम्यानच्या नवीन रेल्वे सेवेलाही प्रधानमंत्री हिरवा झेंडा दाखवतील. उदेपूर-धार प्रकल्पाचा भाग म्हणून विकसित केलेल्या जोबाट-तांडा दरम्यानच्या नवीन रेल्वे मार्गाचं राष्ट्रार्पणही प्रधानमंत्री करणार आहेत. प्रधानमंत्र्यांच्या हस्ते, ९ हजार ७०० कोटी रुपयांहून अधिक खर्चाच्या तीन रेल्वे प्रकल्पांची तसंच, सुमारे १ हजार ७८० कोटी रुपये खर्चाच्या तीन राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पांची पायाभरणी होणार आहे. गुजरात सरकारच्या सुमारे २ हजार ६०० कोटी रुपये किमतीच्या विविध प्रकल्पांची पायाभरणी आणि उद्घाटनही प्रधानमंत्र्यांच्या हस्ते होणार आहे. त्यानंतर प्रधानमंत्री महाराष्ट्राच्या दौऱ्यावर येत असून मुंबईत ग्लोबल फिनटेक फेस्ट २०२६चं उद्घाटन करणार आहेत.

<><><><><>

संरक्षण दलांसाठी १ लाख १० हजार कोटी रुपयांच्या खरेदी प्रस्तावाला आज संरक्षण सामुग्री अधिग्रहण परिषदेनं मंजुरी दिली. प्रस्तावित संरक्षण सामुग्रीमध्ये जैव रासायनिक किरणोत्सारी तसंच आण्विक टेहळणी वाहनं, शीघ्रगती वाहनं, स्वयंचलित सुरुंग पेरणी वाहनं, हलक्या वजनाचे आधुनिक हेलिकॉप्टर, विशिष्ट प्रकारचे रणगाडे, पूल उभारणी साहित्य, रडार यंत्रणा तसंच सागरी गॅस टर्बाईनसह इतर संरक्षण सामुग्रीचा समावेश असणार आहे. तिन्ही दलांसाठी केली जाणारी ही बहुतांश खरेदी भारतीय औद्योगिक क्षेत्राकडून केली जाणार असल्याचं संरक्षण मंत्रालयानं स्पष्ट केलं आहे.

<><><><><>

देश २०२९ पर्यंत अमलीपदार्थमुक्त करण्यासाठी पुढाकार घेऊन काम करण्याचं आवाहन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज पोलीस दलाला केलं. राष्ट्रपतींचा पोलीस ध्वज गोवा पोलिसांना प्रदान केल्यानंतर ते गोव्यात तळेगाव इथं बोलत होते. सायबर गुन्ह्यांसंदर्भातली हेल्पलाईन १९३० साठी नवीन एआय ध्वनिसहायकाचं उद्घाटनही त्यांनी केलं. या हेल्पलाईनवर १२१ भाषांमधे तात्काळ मदत पुरवली जाते.

त्याआधी पश्चिम विभागीय परिषदेची २८वी बैठक आज केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या अध्यक्षतेखाली गोव्यात पणजी इथं झाली. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्यासह गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल, गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत, तसंच दमण दीव आणि दादरा नगरहवेलीचे प्रशासक प्रफुल्ल पटेल यांच्यासह केंद्र आणि राज्यसरकारांमधले वरिष्ठ अधिकारी बैठकीला उपस्थित होते.

<><><><><>

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षांमधे पेपरफुटी आणि इतर गैरप्रकारांची जबाबदारी स्वीकारुन आयोगाचे अध्यक्ष विवेक भीमनवार यांनी राजीनामा द्यावा अशी मागणी एमपीएससी उमेदवारांनी केली आहे. या आणि इतर १० मागण्यांच्या समर्थनार्थ एमपीएससीची परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांनी आज राज्यात अनेक ठिकाणी मोर्चा काढला. राष्ट्रवादी कॉँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे आणि आमदार रोहित पवार, कांग्रेसचे आमदार विश्वजीत कदम पुण्यातल्या मोर्चात सहभागी झाले होते. राज्यशासनानं आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांशी संवाद साधण्याकरता तातडीनं, जबाबदार प्रतिनिधी पाठवावा अशी मागणी सुळे यांनी केली.

याप्रकरणी मुंबई पोलीस तपास करत असून आतापर्यंत ७ जणांना अटक केली आहे. लोकसेवा आयोगाच्या परीक्षांसंदर्भात सुधारणा सुचवण्यासाठी राज्यशासनानं एक उच्चस्तरीय समितीही स्थापन केली आहे.

एमपीएससी पेपर फुटीप्रकरणी आज कोल्हापुरातही, एमपीएससीची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला. एमपीएससी अध्यक्ष आणि सचिवांनी तात्काळ राजीनामा द्यावा, या प्रमुख मागणीसह एकूण 11 मागण्या विद्यार्थ्यांनी सरकारकडे केल्या आहेत.

<><><><><>

यवतमाळमध्ये गेल्या वीस दिवसांपासून आदिवासी विद्यार्थी आणि तरुणांनी सुरू केलेलं ठिय्या आंदोलन आज मागे घेतलं. आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांनी या विद्यार्थ्यांबरोबर सविस्तर चर्चा करून त्यांच्या मागण्यांबाबत सकारात्मक प्रतिक्रिया दिल्यानंतर विद्यार्थ्यांनी आंदोलन मागे घेतल्याची घोषणा केली.

<><><><><>

भारतीय अंतराळ संशोधन संस्था म्हणजेच इस्रोचे खासगीकरण होणार असल्याच्या बातम्यांचं इस्रोनं खंडन केलं आहे. इसरोचे अध्यक्ष डॉ. व्ही नारायणन यांनी बंगळुरू इथं सांगितलं की इसरो सरकारी संघटना असून त्याच्या खासगीकरणाचा प्रश्नच उद्भवत नाही. सीआयआयने आयोजित केलेल्या एका प्रदर्शनाच्यावेळी ते वार्ताहरांशी बोलत होते. सरकारच्या धोरणांनुसार आता अंतराळ क्षेत्र खासगी उद्योगांना खुलं झालं असून तंत्रज्ञान आणि क्षमतांचा विस्तार केला, तर इस्रोला अत्याधुनिक अंतराळ उपक्रमांवर प्रभावीपणे लक्ष केंद्रित करता येईल, असं ते म्हणाले. इसरोच्या विविध प्रकल्पांमधे ८० टक्के गुंतवणूक भारतीय उद्योगांची आहे, साडेचारशे भारतीय उद्योग इसरोसाठी काम करत आहेत, तसंच इस्रोसाठी सरकारनं पुरेशी तरतूद केली आहे, असं त्यांनी सांगितलं.

इसरोचा व्याप अधिकाधिक वाढत असून वैज्ञानिकांची सेवानिवृत्ती ही नेहमी घडणारी गोष्ट असल्याचं इनस्पेसचे अध्यक्ष पवन गोएंका यांनी सांगितलं.

<><><><><>

नवी दिल्लीत सत्यनिकेतन भागात पाच मजल्यांची इमारत कोसळून झालेल्या दुर्घटनेची न्याय दंडाधिकारी पातळीवर चौकशी केली जाईल, तसंच इमारत मालकाविरुद्ध

गुन्हा दाखल करण्याचे निर्देश दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी दिले आहेत. इमारतीच्या मालकाला राजस्थानातल्या भिवाडी इथं अटक करण्यात आली असून दिल्ली महानगरपालिकेतल्या ५ कर्मचाऱ्यांना याप्रकरणी निलंबित केलं आहे. काल दुपारी इमारत कोसळून झालेल्या या दुर्घटनेत सात जणांचा मृत्यू झाला. दुर्घटनाग्रस्त इमारतीत महाविद्यालयीन विद्यार्थी भाडेतत्वावर रहात होते.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेबद्दल शोक व्यक्त केला आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी दिल्लीच्या मुख्यमंत्री तसंच पोलिस आयुक्त, एनडीआरएफच्या महासंचालकांशी चर्चा करून परिस्थितीचा आढावा घेतला. जखमींना सर्व वैद्यकीय मदत पुरवण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

दरम्यान, या दुर्घटनेची उच्चस्तरीय चौकशी करण्याचे निर्देश दिल्ली उच्च न्यायालयानं आज दिल्ली महानगरपालिकेला दिले. इमारतीचं बांधकाम करण्यासाठी आवश्यक परवानग्या घेतल्या होत्या का याची तपासणी करून प्रशासकीय पातळीवरच्या त्रुटींसाठी जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचे, तसंच दिल्लीतल्या सर्व 'पेईंग गेस्ट' निवासस्थानं आणि वसतिगृहांचं एका आठवड्याच्या आत सर्वसमावेशक लेखापरीक्षण करण्याचे निर्देशही दिल्ली उच्च न्यायालयानं दिले.

<><><><><>

नेपाळमधल्या महापुराच्या आपत्तीदरम्यान बेपत्ता झालेल्या भारतीय नागरिकांची ओळख पटवता यावी यासाठी त्यांच्या कुटुंबीयांनी डीएनए नमुन्यांबाबतची माहिती पाठवावी असं आवाहन चीनमधल्या भारतीय दूतावासानं केलं आहे. आंतरराष्ट्रीय मान्यताप्राप्त कोडीस आराखड्याच्या स्वरूपातली ही माहिती पडताळणीसाठी चिनी प्राधिकरणांकडे पाठवली जाणार आहे.

<><><><><>

मराठा आरक्षणाच्या मागणीसंदर्भात आंदोलक मनोज जरांगे यांनी येत्या १२ सप्टेंबरला जालन्यात आंतरवाली सराटी इथे बैठक बोलवली आहे. या बैठकीला मराठा समाजातल्या बांधवांनी उपस्थित राहावं असं आवाहन जरांगे यांनी केलं आहे. जरांगे यांच्या बेमुदत उपोषणाचा आजचा दहावा दिवस असून आपल्या मागण्यावर सरकारकडून ठोस प्रतिसाद

मिळत नसल्याचा आरोप त्यांनी आज वार्ताहरांशी बोलताना केला. आरक्षणाचा प्रश्न मार्गी लागला नाही तर मुंबईकडे जाण्याचा निर्णय बैठकीत घेणार असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं.

**<><><><>**

निवृत्त न्यायमूर्ती शिंदे यांच्या समितीनं शोधलेल्या ५८ लाख नोंदींच्या याद्या राज्यातल्या प्रत्येक ग्रामपंचायतींमध्ये लावल्या जाणार असून, कुणबी दाखले मिळण्यातल्या अडचणी दूर करण्यासाठी १० ते १७ सप्टेंबर दरम्यान प्रत्येक जिल्ह्यात शिबिरे आयोजित करण्यात येणार आहेत. याबाबत सर्व जिल्ह्यांतल्या अधिकाऱ्यांनी योग्य समन्वय राखून मराठा आरक्षणाबाबतच्या प्रत्येक मुद्द्याविषयी गांभीर्यानं कार्यवाही करावी, अशा सूचना मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी विभागीय आयुक्तांसह सर्व जिल्ह्यांच्या जिल्हाधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

**<><><><>**

हिंगोलीमध्ये ऑटोरिक्षा आणि पीक-अप या दोन वाहनांची समोरासमोर धडक होऊन झालेल्या अपघातात तीन जण ठार तर चार जण जखमी झाले. मृतांमध्ये माय-लेकीचा समावेश आहे. औंढा नागनाथ ते झिरोफाटा या रस्त्यावर कळंबा पाटी ते गुंडा पाटी दरम्यान आज दुपारी हा अपघात झाला.

**//<><><><>//**